कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), कराड, जि.सातारा अंतर्गत कृष्णा कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, कराड, जि. सातारा
नवीन भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास व सुरु असलेल्या भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्यास परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक.एमईडी १०२२/प्र.क्र.३२९/२२/शिक्षण-२
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१
दिनांक:-१४/०६/२०२४

संदर्भ:-१) निबंधक, कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), कराड, जि.सातारा यांचे पत्र क्र.KIMSDU/G-३/९३१/२०२२, दि.०४/०४/२०२२.

२) निबंधक, कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), कराड, जि.सातारा यांचे पत्र क्र.KIMSDU/G-३/९३२/२०२२, दि.०४/०४/२०२२.

३) निबंधक, कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), कराड, जि.सातारा यांचे पत्र क्र.KIMSDU/G-३/९३३/२०२२, दि.०४/०४/२०२२.

४) निबंधक, कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), कराड, जि.सातारा यांचे पत्र क्र.KIMSDU/G-३/९३४/२०२२, दि.०४/०४/२०२२.

५) निबंधक, कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), कराड, जि.सातारा यांचे पत्र क्र.KIMSDU/G-३/९३५/२०२२, दि.०४/०४/२०२२.

६) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी /पीजी /६७५/ २०२३, दिनांक १४/०६/२०२३.

७) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.DMER-११०१५/२८/२०२३-CETIT, दि.२८/११/२०२३.

**प्रस्तावना :-** कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), कराड, जि.सातारा अंतर्गत कृष्णा कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, कराड, जि. सातारा या संस्थेकडून नवीन भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास व सुरु असलेल्या भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता वाढ करण्यासाठी संदर्भ क्र.१ ते ५ येथील पत्रांन्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.६ येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडून छाननी अहवाल समितीच्या अभिप्रायासह शासनास प्राप्त झाला होता. त्यास अनुसरून सक्षमता तपासणी करुन, संदर्भ क्र.७ येथील पत्रान्वये, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याने, सदर महाविद्यालयामध्ये नवीन भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास व सुरु असलेल्या भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), कराड, जि.सातारा अंतर्गत कृष्णा कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, कराड, जि. सातारा या संस्थेस सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये खाली नमूद विषय त्यापुढे दर्शविलेल्या प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास व सुरु

असलेल्या भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | MPTh (Obstetrics and Gynaecology) | ०३ |
| २ | MPTh (Geriatric Physiotherapy) | ०३ |
| ३ | MPTh (Orthopaedics Manual Therapy) | ०३ |
| ४ | MPTh (Peadiatrics Neurology) | ०१ वरून ०३ |
| ५ | MPTh (Community Health Sciences) | ०२ वरून ०३ |

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१. उक्त संस्थेतील सदर भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेश क्षमता वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे राहील.

२. राज्य शासन, केंद्रशासन, मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशांकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद यांनी भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युटस् (प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

६. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. विद्यापीठाचे संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नयेत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

९. शासकीय भौतिकोपचार किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

३. सदर आदेश हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई

५. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१०. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
१३. कुलसचिव, कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), कराड, जि.सातारा
१४. प्राचार्य, कृष्णा कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, कराड, जि. सातारा
१५. निवडनस्ती (शिक्षण-२)

---